## प्रसिध्दी पत्रक

दिनांक:-08/01/2021

**मारुती श्रीमंत निकम, वय ५७ वर्ष, मुख्याध्यापक, श्रीसंत मारुती महाराज विद्यालय, कानेगाव, रा.कानेगाव, ता.लोहारा, जि. उस्मानाबाद यांनी 5000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | मारुती श्रीमंत निकम, वय ५७ वर्ष, मुख्याध्यापक, श्रीसंत मारुती महाराज विद्यालय, कानेगाव, रा.कानेगाव, ता.लोहारा, जि. उस्मानाबाद |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.08.01.2021 रोजी कानेगाव येथे राघवेंद्र कुलकर्णी यांचे घरासमोर |
| तपासी अधिकारी | श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 5000/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदारांच्या आईच्या नावे फॅमीली पेंन्शनचा प्रस्ताव संबंधीत कार्यालयास पाठवुन त्यांचे जीपीएफचा व ग्रॅज्युटीचा चेक मिळवुन दिल्याचे बक्षीस म्हणुन |

यातील तक्रारदारांच्या आईच्या नावे फॅमीली पेंन्शनचा प्रस्ताव संबंधीत कार्यालयास पाठवुन त्यांचे जीपीएफचा व ग्रॅज्युटीचा चेक मिळवुन दिल्याचे बक्षीस म्हणुन श्रीसंत मारुती महाराज विद्यालय, कानेगावचे मुख्याध्यापक निकम यांनी तक्रारदार यांचेकडे 5000/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना मुख्याध्यापक निकम यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.08.01.2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री.गौरीशंकर पाबळे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने मुख्याध्यापक निकम यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष 5000/-रुपये लाचेची मागणी करुन 5000/- रु लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे आज दि.08.01.2021 रोजी सापळा आयोजीत केला असता मारुती श्रीमंत निकम, वय ५७ वर्ष, मुख्याध्यापक, श्रीसंत मारुती महाराज विद्यालय, कानेगाव, रा.कानेगाव, ता.लोहारा, जि. उस्मानाबाद यांनी कानेगाव येथे राघवेंद्र कुलकर्णी यांच्या घरासमोर तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 5000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे लोहारा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक यांनी पथकाच्या मदतीने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

**2)** श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

**3) टोल फ्री क्र. 1064,** दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-** dysposmanabad@gmail.com

पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद

Scanned with CamScanner